मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 3 मार्च 2025 | पान- 1

# महापालिकेने दिला 'वेस्ट टू एनर्जी'ला बूस्टर डोस

**दररोज 12 मेगावॅट वीज तयार, ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मिती : नदी प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून कचऱ्यापासून दररोज १२ मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे. तर १५ लाख घनमीटर कचऱ्याच्या बायोमायनिंगचा वापर करण्यात येत आहे. ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मिती आणि नदी प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पाच ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येणार आहे. याकरिता अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज सुमारे १,२०० टनांपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो. तो कॉम्पॅक्टर वाहनांद्वारे मोशी कचरा डेपो येथे आणला जातो. तेथे कचऱ्यापासून वीजनिर्मिती (वेस्ट टू एनर्जी) या ७०० टन क्षमतेच्या प्रकल्पामधून दररोज १२ मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे. आता दुसऱ्या टप्प्यात महापालिका प्रशासनाने प्रायोगिक तत्वावर १,५०० टन क्षमतेचा 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प आणि ३०० टन क्षमतेचा बायो मिथेनेशन आणि बायो प्लांट सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ९४७.०३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील प्रत्येकी २२ टक्के निधी केंद्र आणि राज्य शासन आणि उर्वरित निधी खासगी एजन्सी देणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारणतः ३६ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

नदी प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पाच ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येणार आहे. कृषी आणि औद्योगीक वापरासाठी १०० दशलक्ष लिटर क्षमतेचे आणि पिण्यायोग्य नसलेले घरगुती वापरासाठी १० दशलक्ष लिटर क्षमतेचे प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. प्रक्रिया केलेले पाणी साठवणुकीसाठी उन्नत आणि भूमिगत टाक्या बांधण्यात येणार आहेत. तर वितरणासाठी २५० कि.मी.ची पाइपलाइन टाकण्यात येणार आहेत. प्रक्रिया केलेले पाणी पाइपलाइनद्वारे उद्योगांना वापरासाठी देण्यात येणार आहे.




### ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मिती

» स्वच्छ भारत मिशनच्या 'गोबरधन' योजनेंतर्गत ३७५ टन बायो मिथेनेशन प्लांटला मागील वर्षी मंजुरी मिळाली आहे. महापालिकेकडून मोशी येथे सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर आधारित कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लांट पाच एकरावर उभारण्यात येणार आहे.यासाठी ६७ कोटी ५४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यात पिंपरी-चिंचवड महापालिका २७ कोटी रुपये खर्च करणार आहे. उर्वरित निधी केंद्र आणि राज्य शासन देणार आहे. या प्रकल्पात दररोज सुमारे ३७५ दशलक्ष टन ओल्या कचऱ्यापासून अंदाजे २० हजार किलो सीएनजी तयार होणे अपेक्षित आहे.

### कचऱ्याचा 'बायोमायनिंग'साठी वापर

» शहरातील वाढते वायू प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहे. यात आता महापालिका प्रशासनाने मोशी येथील कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्याचे नियोजन केले आहे. १५ लाख घनमीटर जुना कचरा बायोमायनिंगसाठी वापरण्यात येणार आहे. त्यामुळे डेपोतील कचऱ्याचे ढिगारे कमी होण्याची अपेक्षा आहे.

# साडेतीन लाख अनधिकृत बांधकामावर पडणार हातोडा

**पिंपरी-चिंचवडमध्ये शहरातील अनधिकृत बांधकामावर राज्य सरकारकडून कारवाईचे निर्देश**

**पिंपरी | प्रतिनिधी**

अनधिकृत बांधकामे शोधून पाडा, असे निर्देश राज्य सरकारने महापालिका आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामावर आता हातोडा पडणार आहे. मात्र, बेकायदा निवासी बांधकामे नियमितीकरणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने त्यावरदेखील कारवाई होईल का, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामाची संख्या साडेतीन लाखाहून अधिक आहे. शहरातील अवैध बांधकामांचा विषय हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे.मागील १५ वर्षांत लोकसभा, विधानसभा निवडणुका असो की महापालिका निवडणुका... राज्यातील प्रत्येक पक्षाचे प्रमुख नेते ही अवैध बांधकामे लवकरच अधिकृत होतील, असे आश्वासन देत असतात. मात्र, महापालिकेचा बांधकाम आणि नियंत्रण विभागाने शहरातील अनधिकृत बांधकामे करणाऱ्या सुमारे साडेचार हजार बांधकामधारकांवर फौजदारी केस दाखल केलेली आहे. सुमारे ९० हजार नागरिकांना नोटीस आणि दहा हजार बांधकामावर हातोडा चालविला आहे. या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर आमची निवासी बांधकामे कधी अधिकृत होणार, असा सवाल शहरवासियांमधून उपस्थितीत केला जात आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामाची शास्ती माफ केली. उपयोगकर्ता शुल्काला स्थगिती दिली. आता अनधिकृत बांधकामे लवकरच अधिकृत करण्यात येतील, असं आश्वासन खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरवासियांना दिले. त्यामुळे अवैध बांधकामाचा प्रश्न प्रत्येक निवडणुकीत ऐरणीवर आला आहे. २०१० पासूनची अवैध बांधकामे अधिकृत करा, अशी मागणी पिंपरी-चिंचवडकरांची आहे. लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्षाच्या राज्यातील नेत्यांनी निवडणूक झाल्यावर पिंपरी-चिंचवडकरांच्या आशेवर पाणी फिरविले आहे. प्रत्येक निवडणूक डोळ्यासमोर अवैध बांधकामे लवकरच नियमित करु, असे आश्वासन दिले जाते.




> शहरातील अवैध बांधकामावर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अवैध बांधकामावर कारवाई सतत सुरुच असते. अवैध बांधकाम करणा-यांना नोटीस देणे ही निरंतर प्रक्रिया आहे. मात्र, रस्ता नसलेले, अडचणीच्या ठिकाणी बांधलेले, शेजारील अन्य बांधकामामुळे जी बांधकामे पाडता येत नाहीत. त्या बांधकामाच्या मालकांवर महापालिकेकडून फौजदारी गुन्हे दाखल केले जातात.
>
> - मनोज लोणकर, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# महानगरपालिकांनी पाण्याचे काटेकोरपणे नियोजन करावे : अजित पवार

## जिल्ह्यातील विविध धरण प्रकल्पांच्या कालवे सल्लागार समित्यांच्या बैठका उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विविध धरण प्रकल्पांच्या कालवे सल्लागार समित्यांच्या बैठका उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागीय आयुक्त कार्यालयात संपन्न झाली. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी १५ जुलै २०२५ पर्यंतच्या पाण्याचे काटेकोरपणे नियोजन करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

यावेळी मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सिद्धार्थ शिरोळे,भीमराव तापकीर रामराजे नाईक निंबाळकर, विजय शिवतारे, राहूल कुल,, हेमंत रासने, बापूसाहेब पठारे, ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके,चेतन तुपे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



### समन्यायी तत्वाने पाणी वाटप व्हावे

» यावेळी खडकवासला, पवना, चासकमान, भामा आसखेड, नीरा उजवा कालव्यातील पाणी नियोजन, पाणी वापर व उपलब्ध पाणीसाठा याबाबत आढावा घेण्यात आला. नीरा उजव्या कालव्याचे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे, पाण्याचा फेरविचार करून कृष्णा, धोम व गुंजवणी कालव्याच्या अडचणी सोडवाव्यात व समन्यायी तत्वाने पाणी वाटप व्हावे, अशी मागणी रामराजे नाईक निंबाळकर यांनी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जिल्ह्यातील हवेली, इंदापूर, दौंड, बारामती तालुक्यातील शेती सणसर जोड कालव्यावर अवलंबून आहे. त्यासाठीच्या पाण्याचे योग्य नियोजन करा. यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवून तारतम्याने कामे पूर्ण करा, पाणी गळती शोधून त्याची दुरुस्ती करा. नवीन मुठा उजवा कालवा पहिले आवर्तन कालावधी ६० ऐवजी ५५ दिवस व दुसरे आवर्तन दौंड नगरपालिका व इतर पिण्याच्या पाण्यासाठी ३८ दिवसांऐवजी ४५ दिवस करावे, जनाई- शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कामाची निविदा मंजूर करण्यात आली असून चांगल्या प्रतीची पाईपलाईन करा, कंत्राटदारांनी कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई केल्यास त्यांना काळ्या यादीमध्ये टाकण्यात येईल. जनाई शिरसाई योजनेच्या कामासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

### प्रकल्प आराखड्यानुसार मंजूर पाण्याचे वितरण करा

» प्रकल्प आराखड्यानुसार मंजूर करण्यात आलेले पाणी सर्व प्रकल्पांना वितरीत करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी यावेळी दिल्या. उपसा सिंचन पाणीपट्टी वाढीला स्थगिती देण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, सर्व गावांतील शेतकऱ्यांना समान पाणी देण्यात यावे, पंढरपूर व सांगोला येथे आवर्तन सुरळीत करण्याची कार्यवाही तातडीने करावी, सणसर जोड कालव्याला मंजूर पाणी देण्यात यावे. कालव्यांची दुरुस्ती आवश्यक असल्यास एका आठवड्यात पूर्ण करावी, पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा, पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी मीटर बसवावेत असेही ते म्हणाले.

मंत्री भरणे म्हणाले, सणसर जोड कालव्यासाठी ३.९ टीएमसी पाणी मंजूर आहे. या कालव्याला सिंचन आराखड्यात पाणी देण्यात आले नाही. मंजूर पाणीसाठ्याप्रमाणे पाणी मिळाल्यास इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अडचणीला सामोरे जावे लागणार नाही.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, शहरातील कालव्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. भिलारेवाडी बंधाऱ्याबाबत शहरातील पाणी गळतीबाबत महानगरपालिकेने तातडीने कार्यवाही पूर्ण करावी.

खासदार सुळे म्हणाल्या, पुरंदर उपसा सिंचन योजना सुरळीत करावी, भेकराईनगरच्या बोगद्याला अर्थसंकल्पात निधी देण्यात यावा, खडकवासला परिसरातील वाढते प्रदूषण लक्षात घेऊन उपाययोजना कराव्यात.

सोलापूर जिल्ह्याला १२ महिने पाणी मिळावे यासाठी आवर्तन वाढवावे, पाणी वाटपाचे योग्य नियोजन करावे अशी मागणी माजी आमदार राम सातपुते यांनी केली.

बैठकीला पुणे, सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# एसटी महामंडळात आता आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक

## एसटी महामंडळ आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट बसस्थानकात घडलेली घटना अत्यंत निंदनीय आहे. या घटनेच्या निमित्ताने महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ह्या अनुषंगाने बैठकीत त्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला असून येथील सुरक्षा कर्मचारी वाढविणे यासोबतच एसटी महामंडळात एक सुरक्षारक्षक कमिटी नेमून त्यात आयपीएस दर्जाचा सुरक्षा अधिकारी नेमणार असल्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

स्वारगेट येथे घडलेल्या महिला अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर राज्यमंत्री मिसाळ यांनी एसटी महामंडळ आणि पोलीस अधिकाऱ्यांची शनिवारी



(दि. १) आढावा बैठक घेतली. यावेळी वाहतूक शाखेचे अमोल झेंडे, एसीपी वाहतूक अश्विनी राख, प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांच्यासह एसटी, पोलीस आणि आरटीओ विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीबद्दल माहिती देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, "पूर्वीसारखे सुरक्षा दक्षता अधिकारी नव्याने नेमण्यात येतील. पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. स्वारगेट स्थानकात यापूर्वी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. त्यांची संख्यादेखील आता वाढविण्यात येईल. महिला सुरक्षेच्या दृष्टीने ज्या काही उपाययोजना करण्याची गरज आहे, त्या तत्काळ केल्या जातील." या प्रकरणात जे अधिकारी किंवा ठेकेदार दोषी असतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचेही मिसाळ यांनी सांगितले. केंद्र सरकारने आणलेल्या स्क्रॅपपॉलिसी नुसार ज्या बसेस स्क्रॅप करण्याची गरज आहे, त्या राज्यातील सर्व आगारातील बसेस येत्या १५ एप्रिलपर्यंत स्क्रॅप करणार असल्याचेही मिसाळ यांनी सांगितले.

### खासगी बसचालकांची एसटी स्थानकातील घुसखोरी रोखणार

» बसस्थानकाच्या आवारात तक्रार निवारण कक्ष, तक्रार नोंदवण्यासाठी एक टोल फ्री क्रमांक राज्यात दिला जाईल, तसेच खासगी बसचालकांची एसटी स्थानकात होणारी घुसखोरी रोखण्यासाठीदेखील उपाययोजना आखण्याचे निर्देश दिल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले. दरम्यान, केंद्र सरकारने आणलेल्या स्क्रॅपपॉलिसी नुसार ज्या बसेस स्क्रॅप करण्याची गरज आहे, त्या राज्यातील सर्व आगारातील बसेस येत्या १५ एप्रिलपर्यंत स्क्रॅप करणार असल्याचेही मिसाळ यांनी सांगितले.

# महापालिका देणार वैद्यकीय सुविधांवर भर

## बर्न वॉर्ड, ट्रॉमा युनिट, डायलिसिस कक्ष, सीटी स्कॅनसह प्लास्टिक सर्जरी विभागही सज्ज; सर्व रुग्णालयांत मॅनेजमेन्ट इन्फोर्मेशन सीस्टिम लागू होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. शहरातील नागरिकांना आरोग्याच्या पायाभूत सोयी-सुविधा चांगल्या दर्जा मिळाव्यात. याकरिता वैद्यकीय विभागाने कंबर कसली आहे. यंदाच्या महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात वैद्यकीय सुविधांच्या सक्षमीकरणासाठी भरघोस तरतूद केली आहे. यामुळे ३० बेडचे बर्न रुग्णालय, ट्रामा युनिट, डायलेसिस युनिट, प्लास्टिक सर्जरी विभाग, २५० बेडचे प्रसूती व बालरोग रुग्णालय उभारण्यास मोठी तरतूद केली आहे. तर शहरात ७० ठिकाणी शहरी आरोग्य केंद्र सुरू पोर्ट केबिन करण्यात येत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी शहराच्या विविध भागांमध्ये ८ मोठी रुग्णालये, २७ दवाखाने, २० आरोग्य केंद्र, ८ कुटुंब नियोजन केंद्र, ३६ लसीकरण केंद्र आहेत. ७५० खाटांच्या क्षमतेचे सर्वांत मोठे वायसीएम रुग्णालय, ४०० खाटांचे थेरगाव रुग्णालय, १०० खाटांचे नवीन भोसरी रुग्णालय, १३० खाटांचे नवीन आकुर्डी रुग्णालय आणि १२० खाटांचे नवीन जिजामाता रुग्णालय यासह एक हजार ५८९ खाटांची व्यवस्था महापालिकेच्या रुग्णालयात आहे. प्रचंड वाढलेली महागाई, त्यात वैद्यकीय औषधोपचार व खर्च सर्वसामान्य रुग्णांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. पिंपरी चिंचवड शहरात महापालिकेच्या वैद्यकीय सेवा, सुविधांमुळे जिल्ह्यासह आंतरबाह्य रुग्ण उपचारांसाठी येत आहेत. त्यामुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शहरी भागातील अतिशय दाटीवाटीने वसलेल्या भागापासून ते झोपडपट्टी वस्तीतही नागरिकांना वैद्यकीय सुविधा मिळत आहेत.

महापालिकेचे नव्याने सुरू झालेले तालेरा रुग्णालयही मोठे आहे. प्रसूती तसेच अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया येथे होत असतात. तालेरा रुग्णालयात २५० खाटांचे प्रसूती कक्ष आणि बालरोग रुग्णालय सुरू होत आहे. या रुग्णालयात युरोलॉजी आणि प्लॅस्टिक सर्जरीसाठी विभाग सुरू करण्यात येत आहे. महापालिकेच्या चार नवीन रुग्णालयांमध्ये डायलेसिस युनिट सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये हॉस्पिटल मॅनेजमेन्ट इन्फोर्मेशन सीस्टिम (एचएमआयएस) लागू करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये शहरातील नागरिकांचा आरोग्याचा डाटा एकत्रित होऊन संपूर्ण हिस्ट्री कोणत्याही रुग्णालयात गेल्यास दिसणार आहे.



### कॅन्सर आणि बर्न रुग्णालय यावर्षी सुरू करणार

» महापालिकेकडून शहरात कर्करोग रुग्णालय सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. याबाबत पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नवीन थेरगाव रुग्णालयाशेजारी शंभर बेडचे स्वतंत्र रुग्णालय सार्वजनिक खासगी भागीदारीवर (पीपीपी) तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सगळी प्रक्रिया पूर्ण करून मार्चअखेर रुग्णालयाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या जुन्या तालेरा रुग्णालयात ३० खाटांचे बर्न (जळीत) रुग्णालय सुरू करण्यात येत आहे. त्याचेही काम अंतिम टप्प्यात आहेत. जळीत रुग्णालय सुरू करण्यासाठी तालेरा रुग्णालयात प्लॅस्टिक सर्जरीसाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात येणार आहे.

> शहरातील प्रत्येक नागरिकाला महापालिकेच्या दवाखाने, रुग्णालयात चांगल्या दर्जाची सोयी-सुविधा मिळाव्यात, याकरिता वैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. पालिकेच्या रुग्णालयांमध्ये चांगल्यात चांगली सेवा उपलब्ध करून देणे आणि सर्व प्रकारच्या रोगांवर उपचार होणे, गरजेचे आहे. त्यामुळे नवीन कर्करोग रुग्णालय, बर्न रुग्णालय, बालरोग रुग्णालय, मल्टिस्पेशालिटी रुग्णालय, ट्रामा युनिटसह हॉस्पिटल मॅनेजमेन्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम लागू करत आहोत.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

> शहरातील रुग्णालये, दवाखाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाने स्मार्ट बनवण्यात येत आहेत, सातत्यपूर्ण आरोग्य व गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. विविध आजारांचे निरीक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी, तसेच सुलभ व परवडणारी दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान केली जाईल. सर्वसामान्य नागरिकांसह गरजू रुग्णांना जलद आरोग्य सेवा, उपचार देण्याचा कायम प्रयत्न राहणार आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

# भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाच्या खर्चात वाढ

## शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असताना कामाच्या खर्चातही विविध कारणांमुळे वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असताना कामाच्या खर्चातही विविध कारणांमुळे वाढ होत आहे. जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे उच्चदाब वीज खांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे खर्चात तीन कोटींनी वाढ होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने आंद्रातून १०० आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. धरणातून जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेने २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून जलवाहिनी टाकण्याचे काम ऑफशोअर इंडिया लि. या ठेकेदाराला दिले. या कामाची चार वर्षांची मुदत संपली, तरी हे काम अपूर्णच आहे. या जलवाहिनीचे काम ५० टक्केच पूर्ण झाले आहे. नवलाख उंब्रेपासून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनीचे संपूर्ण काम १६२ कोटी रुपयांचे आहे. याचा कार्यारंभ आदेश १५ डिसेंबर २०२० रोजी दिला होता. कामाची मुदत १५ डिसेंबर २०२४ अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत १९ किलोमीटरपैकी केवळ नऊ किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.



### मारामाऱ्या झाल्या नित्याच्याच

» खेड येथील वाकीतर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून इंदोरीपर्यंत जलवाहिनीच्या कामाला ३०० उच्चदाब खांब अडथळा ठरत आहेत. हे खांब हलविण्यासाठी महापालिकेने सात दिवसांच्या अल्पमुदतीची तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. महावितरणच्या परवानगीनंतर शुल्क भरून हे काम हाती घेतले जाणार आहे. त्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागणार आहे.

# सासवड एसटी स्थानक रात्री रामभरोसे!

## लांब पल्ल्याच्या सर्व गाड्या बस स्थानकात न येत रस्त्यावरूनच पुढे जातात. बस स्थानकात फक्त चोरटे, खिसेकापू यांचीच वर्दळ असते.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पंढरपूर या राष्ट्रीय पालखी महामार्गावरील पुरंदर तालुक्यातील सासवड येथील एसटी बस आगार सर्वात सुरक्षित समजले जाते. पुणे शहरापासून सर्वात जवळचे असून सासवडच्या मध्यवर्ती असल्याने त्यास विशेष महत्त्व आहे. दिवसभरात शेकडो प्रवाशी, शालेय विद्यार्थ्यांची वर्दळ असते. परंतु रात्री 10 नंतर येथे वाहतूक व्यवस्थापक व्यवस्थापक उपलब्ध नसतात. त्यामुळे रात्रीचा कारभार बऱ्यापैकी राम भरोसे असतो. परिणामी लांब पल्ल्याच्या सर्व गाड्या बस स्थानकात न येत रस्त्यावरूनच पुढे जातात. बस स्थानकात फक्त चोरटे, खिसेकापू यांचीच वर्दळ असते.

पुणे येथील स्वारगेट बस स्थानकात (दि. 25 फेब्रुवारी) एका युवतीवर शिवशाही बसमध्ये अत्याचार केल्याची घटना (दि. 26 फेब्रुवारी) उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून एसटी बसस्थानके महिलांसाठी सुरक्षित नसल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परिवहन मंत्र्यांनी संपूर्ण राज्यातील एसटी बस स्थानकाचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सासवड बस स्थानकातील परिस्थितीचा आढावा घेतला असता. येथे दररोज रात्रभर वाहतूक व्यवस्थापक उपलब्ध नसल्याचे डेपोमधील अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. परिणामी रात्री दहा नंतर प्रवाशांना रस्त्यावर उभे राहून एसटीची वाट पहावी लागते. काही बस थांबतात तर काही तशाच पुढे निघून जातात. असाही खुलासा करण्यात आला आहे.

पालखी महामार्गावरील पुरंदर तालुक्यातील सासवड येथील एसटी बस आगार सर्वात सुरक्षित समजले जाते. पुणे शहरापासून सर्वात जवळचे असून सासवडच्या मध्यवर्ती असल्याने त्यास विशेष महत्त्व आहे.



### एक-एक अधिकारी मुक्कामी असतात

» बसस्थानक आवारात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सहा सुरक्षा कर्मचारी वेगवेगळ्या वेळेमध्ये 24 तास कार्यरत आहेत. रात्री एक सुरक्षा रक्षक बस स्थानकात आणि एक कर्मचारी बस डेपोमध्ये तैनात असतात. तसेच महिला प्रवाशांसाठी हिरकणी कक्ष 24 तास उपलब्ध असून रात्रीच्या प्रवासात एखाद्या महिलेला बसण्याची व्यवस्था नसल्यास हिरकणी कक्षात व्यवस्था करण्यात येते. रात्री पोलीस ठाण्याकडून गस्त घालण्यात येते. रात्रीच्या वेळी बस स्थानक आणि बस डेपोमध्ये प्रत्येकी एक एक अधिकारी मुक्कामी असतात असे सहायक वाहतूक अधिकारी राजाराम गायकवाड यांनी सांगितले.

### मारामाऱ्या झाल्या नित्याच्याच

» दिवसा एसटी स्थानकात प्रवाशांची मोठी वर्दळ असते. सणसमारंभ, यात्रा उत्सव, बाजार दिवस यावेळी प्रवाशांची गर्दी असल्याने चोऱ्या, पाकीटमारी करणारे सुसाट असतात. टवाळक्या करणारे दिवसा येवून मारामाऱ्या करण्याच्या घटना वारंवार घडतात. त्यामुळे दिवसा पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी एसटी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

" सासवड बसस्थानक परिसरात पोलिसांच्या वतीने सतत गस्त सुरू असते. दिवसा आणि रात्रीही आमचे कर्मचारी पाहणी करीत असतात. रात्रीच्या वेळी दर तासाला पोलिसांची गाडी जात असते. तर दिवसाही निर्भयापथक, डीबी पथक, राखीव पोलीस कर्मचारी केवळ एसटीबस स्थानकच नाही तर सासवडमधील सर्व शाळा, कॉलेज, बाजारपेठ, रहिवाशांच्या सोसायट्या अशा गजबजलेल्या आणि निर्जन ठिकाणी सुद्धा पोलीस कर्मचारी भेट देवून लोकांच्या संपर्कात असतात. फोन केल्यावर पाच मिनिटांत पोलीस कर्मचारी तिथे पोहोचून कारवाई करतात.

- ऋषिकेश अधिकारी, पोलीस निरीक्षक, सासवड

# मुळशी तालुक्यातील शिक्षकांना चार टप्प्यात प्रशिक्षण

## राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना दिले जात आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना दिले जात आहे. मुळशी तालुक्यातील शिक्षकांना चार टप्प्यात हे प्रशिक्षण दिले जाणार असून बावधन येथील रायन इंटरनॅशनल स्कूलमध्ये पहिला टप्पा सुरू आहे.

पाच दिवसांच्या या प्रशिक्षणात शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत असून ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये, बदल अभ्यासत आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे जिल्हा परिषद आणि मुळशी पंचायत समितीच्या वतीने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील सुमारे एक हजार शिक्षकांना चार टप्प्यात हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात 228 शिक्षक सहभागी झाले आहेत. बावधनच्या रायन इंटरनॅशनल स्कूलमध्ये या प्रशिक्षणाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सुजाता देशमाने, विस्तार अधिकारी अशोक गोडसे यांच्या हस्ते झाले. या प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून मुठा केंद्रप्रमुख सोपान ठकोरे, भूगाव केंद्रप्रमुख चंद्रकांत म्हाळसकर, विषयतज्ञ संतोष गायकवाड व मीनाक्षी खाडे हे काम पाहत आहेत.

प्रियतमा फापाळे, सुवर्णा सातपुते, बापूसाहेब पवार, सुनीता पवार, प्राची दंडवते, पल्लवी चौधरी, विनोद खंडागळे, अक्षता उत्तेकर, सविता थोरात, मनीषा लेकुरवाळे, रत्नदीप रामटेके, संजय बोरसे, महेश सलगंटे, राम करपे, शुभांगी मोरे, रेवणनाथ आढाव हे सोळा तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षण धोरण आराखडा समजावून सांगतात. पाच कुलांमध्ये प्रत्येकी 50 शिक्षकांना हे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामध्ये नवीन शिक्षण धोरणामध्ये जे बदल आहेत, ज्या नवीन संकल्पना आहेत.




" शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये, राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील शालेय शिक्षण आणि पायाभूत स्तर समजून घ्यावा. विद्यार्थ्यांचे क्षमता आधारित मूल्यांकन आणि शाळास्तर मूल्यांकन करावे. विद्यार्थी मूल्यांकनामध्ये समग्र प्रगतीपत्रकाचा, अध्यापनामध्ये अनुभवजन्य व खेळ आधारित पद्धतीचा वापर करावा. 21व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवावे. या उद्देशाने घेतलेले प्रशिक्षण आमच्यासाठी नक्कीच फलदायी ठरेल.

- विवेक देशमुख/परशुराम वाघचौरे, प्रशिक्षणार्थी शिक्षक